## रेग्यूलर दिवाणी मुकदमा नंबर– ३६/२००९

## निशाणी ९२ वरील अंतीम आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मोजणी रजिस्टर १२६/२०१६ नुसार झालेल्या मोजणी नकाशामध्ये वादी न. १ च्या वहिवाटीत असलेल्या क्षेत्रात प्रतिवादी यांनी खरेदी केलेल्या ८९ आर क्षेत्राबाबत दाव्यात दुरुस्ती करुन त्या अनुषंगाने दुरुस्तीचा मजकूर दाव्यात समाविष्ट करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

२. वादी यांनी दिलेल्या अर्जावर निशाणी ९४ येथे प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केले असुन त्यांचे असे कथन आहे की तारीख ६.४.२०१६ रोजी आदेश १२ नियम ६ प्रमाणे दाव्याकमी Judgment on Admission झालेले असल्याने वादीचा दावा अस्तीत्वात नाही त्यामुळे दुरुस्तीचा अर्ज देखील दाखल करणे योग्य नाही. सबब खोटया मजकूराचा अर्ज दाखल करण्यात आला असल्याने तो खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

३. मुळ दावा सन २००९ मध्ये स.न. ४९० ची कोर्ट कमीशनरमार्फत मोजणी करुन मिळण्यासाठी आणि अतिक्रमण निष्पन्न झाल्यास ते दर्शवुन देण्यासाठी दाखल करण्यात आला असुन दाव्याचे कामी निशाणी २७ नुसार मुद्दे काढण्यात आले होते, तारीख ६.४.२०१६ रोजी फक्त मुद्दा नंबर २ बाबत माझ्या पुर्वाधिकाऱ्यानी Judgment on Admission पारीत केली आहे. अशा स्थितीत निशाणी ७९ येथे जो कोर्ट कमीशन अहवाल सादर करण्यात आला त्यानुसार दाव्यामध्ये दुरुस्ती करुन मागण्यास वादी पात्र असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. दाव्यात जी दुरुस्ती करण्यास परवानगीची मागणी करण्यात आली आहे, दुरुस्त मजकूरानुसार दाव्याबाबत मुदतीचा मुद्दा दोन्ही पक्षकारासांठी खुला ठेवण्यात येतो आणि आदेश तारखेपासून १५ कार्यालयीन कामकाज दिवसाचे आत दाव्यात दुरुस्ती करुन त्याच मुदतीत दुरुस्त दावा प्रत वादीने सादर करण्यासाठी वर मुदतीत वादीने दुरुस्ती आणि दुरुस्त दावा प्रत यापैकी कोणतीही कृती करण्यात न आल्यास दुरुस्ती अर्ज नामंजूर करण्यात आला असे समजण्यात येईल.

sdxx

दिनाक – २८.०६.२०१७.

[ स.द.कामत. ]

दिवाणी न्यायाधीश क.स्तर जत.